लातूर समाचार
LATUR SAMACHAR

'एक क्लिक चुकले तर मोठे नुकसान' ; यशवंत विद्यालयात सायबर सुरक्षेची जनजागृती

लातूर/प्रतिनिधी: येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्रिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत यशवंत विद्यालय, नांदेड रोड, लातूर येथे इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. डिजिटल युगात वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः ऑनलाइन गेम्सचे वाढते व्यसन, गेमिंगच्या माध्यमातून होणारी आर्थिक फसवणूक, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवादाचे धोके तसेच गेमच्या नावाखाली मागितली जाणारी वैयक्तिक माहिती शेअर केल्यामुळे उद्भवणारे धोके याबाबत विद्यार्थ्यांना सावध करण्यात आले.

याशिवाय संशयास्पद लिंकवर क्लिक केल्यास होणारे नुकसान, फिशिंग लिंक कशा ओळखाव्यात, मोबाईलमध्ये येणारे बनावट मेसेज व कॉलपासून कसे सावध राहावे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता जपण्याचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना उदाहरणांसह मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाइन फसवणुकीचा बळी ठरल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याची तयारी दर्शवत सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी डी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पांचाळ मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. तसेच विद्यालयातील शिक्षकवृंदाची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.